# फुलपाखरू उद्यानाचे उद्‌घाटन

ठाणे (बातमीदार) : वनशक्ती या स्वयंसेवी पर्यावरण संस्थेने नुकतेच खाडी फ्लेमिंगो पक्षी अभयारण्याच्या भांडुप पम्पिंग स्टेशन येथील परिक्षेत्रात फुलपाखरू उद्यान उभारले आहे. या फुलपाखरू उद्यानाचा उद्‌घाटन सोहळा गुरुवारी (ता. १८) सकाळी १० वाजता कांदळवन क्षेत्राचे अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक एस. वी. रामाराव आणि विभागीय वन अधिकारी आदर्श रेड्डी यांच्या हस्ते पार पडला. निसर्गात फुलपाखरांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या फुलपाखरू उद्यानांमार्फत निसर्गाचे संवर्धन होण्यास मदत होईल, तसेच सामान्य नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण होईल, असे मत स्टॅलिन दयानंद यांनी व्यक्त केले. या वेळी वनक्षेत्रपाल प्रशांत बहादुरे, वन विभागाचे कर्मचारी तसेच विद्याधिराजा हायस्कूल आणि नेरूळ येथील एस. आय. ई. एस. महाविद्यालयाचे ६० विद्यार्थी तसेच शिक्षक उपस्थित होते.